# शंकर जयकिशन - भाग ४



हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील रागदारीवर आधारित अशी या दुकलीने दिलेली गाणी पहा. हेही लक्षात ठेवा की ह्या दोघांनी भातखंडे किंवा तत्सम कुठल्या संगीत विद्यालयात शिक्षण घेतले नव्हते. भैरवी मध्ये 'जिया बेकरार है', 'पतली कमर है', 'हो... मुझे किसीसे प्यार हो गया', 'बरसात मे हमसे मिले तुम सजन' ही सगळी गाणी 'बरसात' चित्रपटातली. 'मेरा जूता है जापानी' आणि 'रमय्या वस्तावैय्या' ('श्री ४२०'), 'सुनो छोटीसी गुडिया की लंबी कहानी' ('सीमा'), 'ऐ मेरे दिल कही और चल' ('दाग'), 'मै पिया तेरी' ('बसंत बहार'), 'किसी ने अपना बनाके मुझको' आणि 'मिट्टीसे खेलते हो बार बार किस लिये?' (दोन्ही 'पतिता' मधली), 'कैसे समझाऊँ' ('सूरज'), 'तेरा जाना' ('अनाडी'), आणि 'दिल अपना और प्रीत पराई' ('दिल अपना और प्रीत पराई').

जोगिया रागावर आधारित - 'दिल एक मंदिर है' ('दिल एक मंदिर'), भूप रागावर आधारित - 'पंछी बनू, उडती फिरू' ('चोरी चोरी'), चारुकेशी मध्ये 'बेदर्दी बालमा तुझको' ('आरजू'), दरबारी कानडा मध्ये 'तू प्यार का सागर है' ('सीमा') आणि 'अब कहाँ जाये हम' ('उजाला'). झिंझोटी मध्ये 'जाऊ कहाँ बता ऐ दिल' ('छोटी बहेन'). अल्हैय्या बिलावल मध्ये 'जाओ रे जोगी तुम' ('आम्रपाली'). शुध्द कल्याण मध्ये 'रसिक बलमा' ('चोरी चोरी'), पहाडी मध्ये 'हो मोरा नादान बालमा' ('उजाला'). बसंत मुखडी मध्ये 'ओ बसंती पवन पागल' ('जिस देश मे गंगा बहती है'). तिलंग मध्ये 'सजन संगे काहे नेहा लगाये' ('मै नशे मे हूँ'). पिलू मध्ये, 'बडी देर भई' ('बसंत बहार'). जयजयवंती मध्ये, 'मनमोहना बडे झूटे' ('सीमा'). किरवाणी मध्ये, 'याद ना जाये बिते दिनोंकी' ('दिल एक मंदिर'). शिवरंजनी मध्ये, 'जाने कहाँ गये वोह दिन' ('मेरा नाम जोकर'). ही यादी मनाला थक्क करणारी आहे आणि या रागदारीच्या भरीला जर तुम्ही एस्.जें.चा तालांचा वापर पाहिलात तर गरगरायलाच होईल. 'बहारों फूल बरसाओ' ('सूरज') मधील शिवरंजनी-दादराचा संयोग. आणि 'ओ मेरे सोनम' ('संगम') मध्ये

शिवरंजनी राग तोच ठेऊन, ताल बदलून केरवा ताल वापरल्यावरचा परिणाम पहा. 'भय भंजना' ('बसंत बहार') या गाण्यात राग मियाँ की मल्हार बरोबर दीपचंडी तालाचा वापर पहा.

रागदारीवर आधारित 'आम्रपाली' व 'बसंत बहार' अशा चित्रपटांत त्यांनी शास्त्रीय संगीताचा उपयोग केला. मात्र केवळ रागांचा उपयोग करणे एवढेच नाही, तर कुठलेही गाणे कर्णमधुर करणे ही त्यांची मोठी कामगिरी होती. त्यांनी दिलेल्या संगीताच्या महान योगदानाबद्दल बोलावे तेवढे थोडेच आहे परंतु ज्यांना म्युझिक नोटेशन्स देखीला वाचता येत नसत त्यांनी केलेल्या कामाची अपूर्वाई दैवी अशीच आहे.

त्यांचे राग संगीत चांगलेच होते, परंतु गायकांकडून भावविवशता आणि अभिव्यक्ती गळयातून कशी काढून घ्यावी हे त्यांचे कसब वाखाणण्याजोगे होते. 'शिकस्त'मध्ये 'सपनोंकी सुहानी दुनियाको' हे आलाप आधारित गीत त्यांनी हिंमतीने तलतला दिले ! 'जंगली'मध्ये रफीच्या तोंडी असलेले 'एहसान तेरा होगा मुझपर' हे रोमँटिक गाणे ! केवळ आर.के. फिल्म्सच्या 'संगम'मधील 'दोस्त दोस्त ना रहा' या गाण्यातूनच नव्हे तर इतर बॅनर्सच्या, उदा. 'ये मेरा दिवानापन है' (यहुदी) यासारख्या गाण्यांतून मुकेशच्या गळ्यातून कारुण्याचे भाव व्यक्त करणे ! या दोघा संगीतकारांबद्दल एक गैरसमज पसरवण्यात आला होता की ते आपल्याकडे जे काही चांगले असेल त्याचा उपयोग आर.के. फिल्म्ससाठी करत असत. परंतु असे मुळीच नव्हते. ते इतरांच्या चित्रपटांसाठीही तेवढेच श्रम घेत असत. जर फिल्मफेअर अवॉर्ड हा यशाचा मानदंड असेल, तर त्यांच्या यशाचे गमक असलेली पुढील ९ उत्कृष्ट संगीताची अवॉर्ड्स याची साक्ष देतील. 'चोरी चोरी' (१९५६), अनाडी (१९५९), 'दिल अपना और प्रीत पराई' (१९६०), 'प्रोफेसर' (१९६२), 'सूरज' (१९६६), 'ब्रह्मचारी' (१९६८), 'पेहेचान' (१९७०), 'मेरा नाम जोकर' (१९७१) आणि 'बेईमान' (१९७२). यांपैकी फक्त 'मेरा नाम जोकर' हा एकमेव चित्रपट आर.के. फिल्म्सचा होता.

(क्रमशः)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or

making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com